ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 7 | ISSUE - 2 | OCT - 2020

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# चांदवडचा किल्ला



डॉ. गुंजन ललेश गरुड
पी. डी. एफ. फेलो, इतिहास विभाग,
सा. फु. पु. विद्यापीठ, पुणे .

## प्रस्तावना

संरक्षणाच्या दृष्टीने भारतात प्राचीन काळापासून किल्ल्यांचे खूप महत्व मानले गेले आहे. रामचंद्रपंत अमात्य यांनी "संपुर्ण राज्याचे सार ते दुर्ग...." अशा शब्दात किल्ल्याचे महत्व सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठा राज्याच्या स्थापनेपासूनच किल्ले मिळविणे, डागडूजी करणे, नवीन किल्ले बांधणे व किल्ल्याचे व्यवस्थापन उत्तम राखणे या बाबींकडे विशेष लक्ष दिलेले आढळते. पुढे पेशवाईच्या काळात सरंजामशाही राज्यव्यवस्था सर्वत्र परसल्याने किल्ल्यांच्या बाबतीतही काही प्रमाणात सरंजामशाहीचा शिरकाव झालेला दिसतो. बहुतांशी किल्ल्यांवर पेशव्यांचे नियंत्रण असले तरी होळकर शिंदेंसारख्या प्रबळ सरदारांना त्यांच्या प्रदेशातील किल्लेही सोपविलेले दिसून येतात. मराठ्यांच्या साम्राज्यासाठी सुरक्षेच्या दृष्टिने किल्ले खूप महत्वाचे होते. चांदवडचा किल्ला हा गडकोट प्रकारात मोडतो त्यामुळे संरक्षणाच्या दृष्टीने खूप महत्वाचा होता. खानदेश, विदर्भ, मुंबई, पुणे विभागाला जोडणारा दुवा म्हणून या किल्ल्याला महत्व आहे. यादवांच्या काळात या किल्ल्याला विशेष महत्व होते, कारण दृढप्रहार हा यादव घराण्याचा मूळ पुरुष होता. त्याने नवव्या शतकात या गडाचे वैभव आणि महत्व मोठया प्रमाणात वाढविले.

किल्ल्याचा परिसर जंगलांनी वेढलेला असल्यामुळे शत्रूला अडविणे सोपे होते. शत्रूवर हल्ला करुन किल्ल्यात आश्रय घेणे सहज साध्य असल्याने या किल्ल्याला यादव काळापासून जे महत्व प्राप्त झाले, ते हा किल्ला ब्रिटिशांच्या ताब्यात जाईपर्यंत तसेच होते. यादव सत्ता संपुष्टात आल्यानंतर या किल्ल्यावर खिलजी घराण्याची सत्ता प्रस्थापित झाली होती. चौदाव्या शतकापर्यंत या किल्ल्यावर दिल्लीच्या सुलतानांचे वर्चस्व होते. दिल्लीच्या सुलतानांची सत्ता कमकुवत झाल्यानंतर दक्षिणेत बहामनी राज्याचा उदय झाला. त्यामुळे चांदवडच्या किल्ल्यावर बहामनी सुलतानांची सत्ता प्रस्थापित झाली. पुढे बहामनी राज्याचे पाच तुकडे झाल्यानंतर मुगलांनी त्याचा बरोबर लाभ उठविला आणि चांदवडच्या किल्ल्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. मुगल मराठे आणि ब्रिटिश अशी या किल्ल्यावरील सत्तेत परिवर्तने घडत गेली. इ.स.१६३५ साली मुगलांनी बागलाण भागावर हल्ले चढविले त्याच काळात त्यांनी चांदवडवर आक्रमण करुन त्यांनी चांदवडचा किल्ला जिंकून घेतला.[१] चांदवडचा महत्वाचा किल्ला मुगलांच्या ताब्यात आल्यानंतर औरंगजेब बादशहाने चांदवड किल्ल्याकडे जातीने लक्ष घातले होते हे खालील काही संदर्भांवरुन दिसून येते. २२ मार्च १६९६ ला चांदवडचा बक्षी व वाकनीस यांची औरंगजेबाने चांदवडहून बदली केली, व त्याला आपल्या सेवेत येण्याचे सांगितले. हे पत्र चांदवडच्या बक्षीला मिळताच तो तेथून निघून गेला. याच वेळी मुबारक खानाची नेमणूक कन्नड येथे झाली होती. मुबारकखानाने त्या बक्षीला आपल्या सेवेत ठेवून घेतले. ही बातमी औरंगजेबाला मिळताच त्याने मुबारकखानाला चांदवडच्या बक्षीला बडतर्फ करण्याचे आदेश दिले होते.[२]

औरंगजेबाने आपल्या आदेशांचे पालन न करणाऱ्यांना कामावारुन काढून टाकण्यास सांगितले. सप्टेंबर १६९९ मध्ये चांदवडचा किल्लेदार इनायततुल्ला हा गंभीर आजारी होता. चांदवड येथील औरंगजेबाच्या गुप्तहेराने त्याला ही बातमी कळविली की चांदवडचा किल्लेदार हा गंभीर आजारी असून तो हातात तलवारही घेवू शकत नाही. औरंगजेबाने चांदवड येथील मुसलिसखान या अधिकाऱ्याला त्वरित किल्ल्यावर जावून खरी वस्तुस्थिती काय आहे ते पाहून माहिती कळविण्यास सांगितले होते.[३] औरंगजेबाने चांदवड येथील किल्ल्याच्या प्रशासनातील कामकाज, कसे चालले आहे व अधिकारी कसे काम करतात या बातम्या आपल्यापर्यंत पोहोचविण्यासाठी गुप्तहेर नेमला होता, परंतू त्याही वरती गुप्तहेरही खरे बोलतो की नाही यासाठी त्याने चांदवड येथील मुसलिसखान या अधिकाऱ्याला सत्य परिस्थिती काय आहे हे पाहण्यासाठी पाठविले. चांदवडचा किल्ला हा औरंगजेबाच्या काळातील महत्वाचा किल्ला असल्याने कोणत्याही बातमीची पूर्ण खात्री करूनच तो निर्णय घेत असावा. यावरुन चांदवडच्या किल्ल्याच्या प्रशासनाच्या बाबतीत औरंगजेबाने कटाक्षाने लक्ष दिलेले दिसून येते.

पेशव्यांच्या काळातही खानदेशच्या संरक्षणाच्या दृष्टीने चांदवडचा किल्ला खूप महत्वाचा होता. इ.स. १७५३ मध्ये गुजरातमध्ये पेशव्यांचा करार झाला, त्यानुसार मुगलांच्या किल्ल्यापैकी 'चांदवड' आणि 'इंद्राई' ह्या किल्ल्यांची हवालदारी मात्र सरंजामदारांना सांगावी आणि किल्ल्याचा वरकड बंदोबस्त हा सरकारकडून केला जाईल असे ठरले.[४] १७५२-५३ ला चांदवडचा किल्ला ताब्यात देताना या किल्ल्याच्या खर्चाची सनद नानासाहेब पेशव्यांनी मल्हारराव होळकर यांना दिली होती. या सनदेत पेशव्यांनी खर्चासाठी दरवर्षी ६ हजार रुपये दिले जातील. या सहा हजार रुपयांपैकी पाच हजार रुपये किल्ल्यात राहणाऱ्या लोकांसाठी होते. पेशव्यांना असे वाटत होते की किल्ल्यावर नोकरी करणाऱ्या लोकांना रोज गावातून ये-जा करण्यापेक्षा स्वतःच्या कुटूंबासहीत जर किल्ल्यात राहिले तर किल्ल्यावर वस्ती होईल आणि ते किल्ल्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने चांगले राहील. या शिवाय किल्ल्यात राहण्याऱ्या दहा कुटूंबांना दहा शेर धान्य दिले जाणार होते. स्वतः मल्हारराव होळकर यांना किल्ल्यावरून पालखीच्या खर्चासाठी पेशव्यांनी एक हजार रुपये सनदेत मंजूर केले होते.[५] म्हणजे चांदवडचा किल्ला हा महत्वाचा असल्याने त्याला लागणारा वरकड खर्च हा सरकारकडून म्हणजे पेशव्यांकडून दिला जाणार होता. चांदवड येथील किल्ल्याचा सरंजाम विठठल शिवदेव यांच्याकडे होता. यांच्याकडे चांदवड परगण्यातील एकूण नऊ गावांची सरंजामी होती. इ. स. १७५२ ला चांदवडचा किल्ला मल्हाररावांकडे गेल्यानंतर त्याच्या बदल्यात विठ्ठल शिवदेव यांना पाटोद्याची कमाविसी दिली होती.[६] इ.स. १७५३ ला चांदवड किल्ल्यांची सबनिसी विनायक बाजीराव यांच्याकडे करार करून दिली होती. त्या प्रमाणे त्यांना ७०० रुपये वेतन दिले होते. म्हणजे एखाद्या महत्वाच्या किल्ल्याची कामाविसी काढून जर दुसऱ्याला दिली तर त्याला त्याबदल्यात दुसऱ्या गावाची कामाविसी दिली जात असे. इ.स. संरक्षणाच्या दृष्टीने चांदवडचा किल्ला खूप महत्वाचा होता. म्हणून या किल्ल्याकडे पेशव्यांचेही विशेष लक्ष राहत असे. इ.स.१७४९-५० पेशवे बाळाजी बाजीरावाच्या काळात चांदवड किल्ल्याचा हवालदार संताजी मोहिते याला त्यांनी पत्राने कळविले होते की; किल्ल्यात वस्तूंचा साठा असावा म्हणून शिवराम नारायण कारकून याच्याबरोबर उंटावरून हळद, तंबाकू, मिरच्या, तेल, तूप, आणि अर्धा शेर भांग पाठविले आहे. हे उंट किल्ल्याच्या पायथ्याशी हा सामान आणतील तेव्हा आपण गडकऱ्यांच्या मार्फत ह्या वस्तू किल्ल्यावर घेवून जाव्यात.[७] पेशवे किल्ल्यावर जीवनावश्यक वस्तूंचा साठा असावा म्हणून प्रयात्नशील असत.

मराठ्यांच्या काळात चांदवडच्या किल्ल्याचा तुरुंग म्हणून वापर केला जात असे. चांदवडच्या किल्ल्यात पेशव्यांनी वेगवेगळया गुन्हेगारांना ठेवले होते त्या गुन्हेगारांना वेगवेगळया शिक्षा व त्या अंमलात आणण्यासाठीचे आदेश दिलेले अनेक उदाहरणे मिळतात. इ. स. १७७३-७४ मध्ये पेशव्यांनी चांदवडच्या हवालदार व कारकून यांना पत्राने कळवले की अच्युतराव गणेश यांचा भाऊ आणि त्यांचे कुटूंब चांदवडच्या किल्ल्यात ठेवले आहे. तेव्हा त्यांना योग्य पध्दतीने अटकेत ठेवून त्यांना मध्यम प्रकारचा शिधा देत जाणे. त्यांच्या कुटूंबाची सर्व मालमत्ता जप्त करुन ती पुण्याला पाठविण्याचे आदेश दिले.[८] इ.स. १७७३-७४ म्हणजेच याच वर्षी चांदवडचा किल्लेदार उध्दव वीरेश्वर

याला पेशव्यांनी सनदेद्वारे कळविले की गंगाराम परदेशी याला अटकेत ठेवण्यासाठी पाठविले आहे. तेव्हा त्याला पायात बेड्या घालून कडक बंदोबस्तात ठेवावे.[९] इ.स. १७७६-७७ ला जावजी बांबळा आणि त्यांच्या लोकांनी बंड केले होते. पेशव्यांनी ते बंड मोडून काढले व त्या बंडात सहभागी असलेल्यांना चांदवड, त्र्यंबक, लोहगढ, वगैरे किल्ल्यात ठेवले होते. त्यापैकी चांदवड किल्ल्यात खरवळा कोळी, ठाकूर, हरी हरवल्याचा मुलगा आणि कुणबी शिपाई या चार जणांना अटकेत ठेवले होते. तेव्हा या चौघांना किल्ल्यातून मुक्त करावे असा आदेश पेशव्यांनी चांदवडच्या किल्लेदाराला दिला होता.[८] पेशव्यांनी नारायणरावाचा वध सुमेरसिंग गाडदी याने ३० ऑगष्ट १७७३ ला केला.[१०] हा वध झाला तेव्हा मिरजचे पटवर्धन यांचा वकील शिवाजी बाबाजी हा पुण्याला होता. त्याने हा वध कसा झाला ते २ सप्टेंबर १७७३ ला मिरजला पत्राने कळविले होते. हा वध मराठा राज्यातील अनेक मुस्सद्यांना आवडला नाही. त्यातूनच बारभाईचे कारस्थान निर्माण झाले, व कोणत्याही परिस्थितीत रघुनाथरावाला गादीवर बसू द्यायचे नाही असे नाना फडणविस वगैरे मंडळींनी ठरविले. नारायणरावाच्या वधातील प्रमुख आरोपी सुमेरसिंग गाडदी याची सासुरवाडी चांदवडची होती. गाडदीची पत्नी व मुले त्यावेळी चांदवडला होती. नाना फडणवीसाने तत्काळ चांदवडच्या किल्लेदाराला कळवून त्याच्या पत्नी व मुलांना ताब्यात घेवून अटक करण्यास सांगितले. त्यांची सर्व मालमत्ता जप्त करण्यास सांगितली. जप्त केलेल्या मालमत्तेची मोजदाद करून त्याची यादी पुण्याला पाठविण्याचे आदेश दिले. गाडदीच्या कुटूंबातील अटक केलेल्या प्रत्येक व्यक्तीस रोज अडीच शेर धान्य अटकेत असे पर्यंत देण्याचे सांगितले होते.[११]

मुजफरखान याच्याकडे नोकरीला असलेले गोविंदराव आपाजी आणि त्यांचे पुर्ण कुटूंब असे सोळा जण चांदवडच्या किल्ल्यात कैद होते. गोविंदरावांना दोन मुली होत्या त्यांचे वय लग्नाचे झाल्याने गोविंदरावांना, त्यांच्या आईला व त्यांच्या बहिणीला मोठी काळजी लागलेली होती. त्यांनी तुरुंगात अन्नत्याग केला होता. गोविंदराव यांचा भाऊ आण्णाजी याने पेशवा बाळाजी बाजीराव यांना उपवर झालेल्या मुलींच्या लग्नासाठी त्यांना मुक्त करावे अशी विनंती केली. त्यावेळी लक्ष्मण हरी हा चांदवडचा कमाविसदार होता. पेशव्यांनी आण्णाजींची विनंती मान्य करुन चांदवडच्या कमाविसदाराला गोविंदराव व त्यांच्या पुर्ण कुटूंबाला मुक्त करण्याचे आदेश दिले. तसेच मुलींच्या लग्नासाठी गोविंदरावांच्या जप्त केलेल्या संपत्तीपैकी एक हजार रुपये देण्याचे आदेश दिले.[१२] अशा प्रकारे चांदवडचा किल्ला होळकरांच्या ताब्यात आल्यावर मराठा राज्यातील अनेक गुन्हेगारांना पेशव्यांनी या किल्ल्यात तुरुंगात ठेवल्याचे दिसून येते. चोरी करणाऱ्यांपासून ते पेशवा नारायणरावाचा खून करणारा सुमेरसिंग गाडदी याचे कुटूंब या सर्वांना चांदवडच्या किल्ल्यात तुरुंगात ठेवण्यात आले होते. या वरुन होळकरांच्या राज्यातील चांदवडचा किल्ला हा खूप महत्वाचा होता हे दिसून येते.

मल्हारराव होळकरांना पेशव्यांनी टांकसाळ सुरु करण्याची परवानगी दिली तेव्हा ती टांकसाळ किल्ल्यावर सुरु करण्यात आली होती. कित्येक वर्षे ही टांकसाळ किल्ल्यात सुरु होती. परंतू काही वर्षांनी किल्लेदाराबरोबर भांडण झाले त्यामुळे ही टांकसाळ किल्ल्यातून गावात आणली गेली. किल्ल्यात आजही आपल्याला टांकसाळीच्या इमारतीचे अवशेष पहायला मिळतात.[१३] या टाकसाळीमध्ये काही कालांतराने ठरविलेल्या वजनापेक्षा कमी आणि अशुध्द स्वरुपाचा रुपया पाडला जावू लागला. कमी प्रतीचे आणि ठरलेल्या वजनापेक्षा कमी वजनाचे चलन जर व्यवहारात असेल तर ते कोणीच स्वीकारणार नाही. आणि त्यामुळे मराठा राज्याची किंमत कमी होईल हे पेशव्यांना माहित होते. इ.स.१७७१ चांदवड येथील अधिकारी दिवाकर अनंत याला पत्राने टाकसाळ बंद करण्याचे सांगितले,[१४] कारण राज्याचे महत्व हे बरचशे नाण्यांवर अवलंबून असते. तेव्हा चांदवड येथे कमी दर्जाची आणि कमी वजनाची नाणी पाडली जात आहे हे लक्षात येताच पेशव्यांनी इ.स. १७७१ चांदवडची टांकसाळ बंद केली.

तुकोजी होळकर यांनी चांदवडची बंद झालेली टांकसाळ सुरु व्हावी म्हणून विठ्ठल गणेश याच्या मार्फत पेशव्यांना इ.स.१७७२ मध्ये विनंती अर्ज केला. पहिल्या माधवराव पेशव्यांनी तुकोजी होळकर यांच्या विनंती

अर्जावर विचार करुन आणि मराठा राज्याची गरज ओळखून इ. स. १७७२ मध्ये तुकोजी होळकरांना चांदवड येथे टांकसाळ सुरु करण्याची सनद दिली.[१५] तुकोजी होळकरांना दिलेल्या सनदेत असे दिसून येते की चांदवडच्या टांकसाळीतून खराब नाणे पडू नये याची जबाबदारी तुकोजी होळकरांनी स्वत: घेतलेली होती. या टाकसाळीला दौलताबाद येथील टाकसाळीला लावलेले सर्व नियम लागू राहतील.[१६] म्हणजे नाण्यांच्या शुद्धातेच्या बाबतीतील सर्व नियम जे दौलताबादच्या टाकसाळीला लावलेले होते ते सर्व नियम पाळले जावेत यासाठी तुकोजी होळकरांनी या टाकसाळीकडे कटाक्षाने लक्ष घातले आणि बघता-बघता चांदवडी रुपया साऱ्या मराठा साम्राज्यात प्रसिध्द झाला. यशवंतराव होळकरांच्या काळात इ. स. १८०४ मध्ये झालेल्या इंग्रज मराठा युध्दात हा किल्ला इंग्रजांच्या ताब्यात गेला.[१७] परंतू फारच थोडे दिवस तो किल्ला इंग्रजांच्या ताब्यात होता. या युध्दानंतर झालेल्या तहात चांदवड किल्ला पुंन्हा होळकरांच्या ताब्यात आला.[१८] इंग्रजांच्या ताब्यात गेला. इ.स.१८१८ मध्ये दुसरा बाजीराव इंग्रजांना शरण गेल्यानंतर इंग्रजांनी महाराष्ट्रातील किल्ले ताब्यात घ्यायला सुरुवात केली. लेफ्टनंट कर्नल मॅकडोवेल हा एप्रिल महिन्यात चांदवडला आला आणि त्याने १० एप्रिल रोजी चांदवड किल्ल्यावर इंग्रजांचे निशाण फडकावले.[१९] मॅकडोवेलने पत्राद्वारे वाटाघाटीची सर्व हकीकत कळविली होती. या पत्रात तो चांदवडविषयी लिहीतो की, "होळकरांनी चांदवडच्या किल्ल्याची मागणी केली होती. त्या विषयी मी सांगितले की खानदेश भागाची शांतता राखणे, चांदवडचा किल्ला असण्यावरच अवलंबून असल्यामुळे तो किल्ला तुमचाकडे राहील अशी आशा धरु नका ...."[२०] सर जॉन माल्कम सारख्या इंग्रज अधिकाऱ्याचे चांदवड किल्ल्याचे खानदेशच्या संदर्भात हे निरिक्षण होते. या वरुनच चांदवड किल्ल्याचे महत्व स्पष्ट होते. होळकर सरकारनेही चांदवड परगणा व किल्ला इंग्रजांच्या ताब्यात जावू नये म्हणून खूप प्रयत्न केले. परंतू त्यात त्यांना यश आले नाही. म्हणजे या तहाने इंग्रजांनी चांदवड परगण्यातील होळकरांचे वर्चस्वच संपुष्टात आणले.

## संदर्भ


१) नाशिक जिल्हा गॅझेटीयर पृ. ८८०

२) कित्ता पृ. १४१

३) पगडी सेतू माधवराव, *मुगल दरबारची बातमीपत्रे भाग* - २,महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई,१९७८. पृ.३०

४) आपटे द.वि.,मुजूमदार ग. जा. (संपादक), *चंद्रचूड दप्तर,* खंड १ व २, भा. इ. सं. मंडळ,पुणे, १९६०, पृ. ३० - ३१.

५ (वाड ग.चि., *पेशवा डायरी,* बाळाजी बाजीराव भाग-२ पृ. ४७

६) ठाकूर वा.वा.,*होळकरशाहीचा इतिहास,* भाग-२ पृ. १२३, १२४

७) वाड ग.चि., *पेशवा डायरी,* बाळाजी बाजीराव भाग-२, पृ. १८९

८) वाड ग.चि., *पेशवा डायरी,* सवाई माधवराव भाग-१, पृ.क्र. ४९-५०

९) कित्ता पृ. ५०

१०) शहा जी.बी., *उपेक्षित दुर्गाचा इतिहास भाग २,*सुमेरु प्रकाशन, डोंबिवली, २००६. पृ. १७०

११) वाड ग.चि., *पेशवा डायरी,* सवाई माधवराव भाग-१ पृ.क्र. ४९-५०

१२ वाड ग.चि., *पेशवा डायरी,* बाळाजी बाजीराव भाग-२ पृ. ७६

१३ शहा जी.बी., *उपेक्षित दुर्गाचा इतिहास, भाग २,* पृ. १०४

१४) चिटणीस दप्तर,पुणे पुराभिलेखागार, रु.क्र.४ पु.क्र. १, पत्र १७२१

१५) वाड ग.चि., *पेशवा डायरी,* थोरले माधवराव भाग-२ पृ.३०५, ३०६

१६) कित्ता पृ.३०५,

१७) ठाकूर वा.वा.,*होळकरशाहीचा इतिहास,* भाग-२ पृ. १२३, १२४
१८) परांजपे, मराठ्यांच्या लढ्याचा इतिहास पृ.९९
१९) शहा जी.बी., दुर्ग जागले जागले,सुमेरु प्रकाशन, मुंबई, २००८. पृ. क्र. २३
२०) वाघमोडे एस. एम., *मराठा सरदारांच्या अधिपत्याखालील खानदेश - विशेषत: होळकरांच्या संदर्भात* अप्रकाशित शोध प्रबंध, उ. म. विद्यापीठ, जळगाव, २००८, पृ. २७२

चांदवड किल्ल्याचे टेहळणी क्षेत्र



चांदवडच्या किल्ल्यावरील टांकसाळीचे अवशेष

